Topic 5. Social Control

सामाजिक नियंत्रण

## A] सामाजिक नियंत्रण : अर्थ आणि स्वरुप

## Social Control : Meaning And Nature

### प्रस्तावना :-

मानवी समाजामध्ये सामाजिक नियमने आणि सामाजिक मूल्ये सार्वत्रिक स्वरुपात दिसून येतात. व्यक्तीच्या वर्तनाला मार्गदर्शन करण्याचे काम त्यांच्याकडून पार पाडले जात असते. समाजातील सर्व सदस्यांनी सामाजिक नियमने आणि सामाजिक मूल्ये यांना अनुसरुन वर्तन करावे अशी समाजाची अपेक्षा असते. मात्र काही व्यक्ती विचलित वर्तन करत असतात. अशा विचलित वर्तनाला प्रतिबंध करणे आवश्यक असते. यासाठी व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी व वर्तनाला आकार देण्यासाठी काही शाखा, साधने समाजामध्ये असतात. व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणारी सामाजिक नियंत्रण ही एक अशीच प्रक्रिया आहे.

सामाजिक नियंत्रण social control ही संकल्पना सर्वप्रथम ~~एड~~ एडवर्ड रॉस यांनी social control या ग्रंथामध्ये स्पष्ट केली. ज्या माध्यमातून समाज आपल्या सदस्यांकडून समाजमान्य वर्तनाच्या आदर्शांना अनुरुप असे वर्तन घडवून आणतो. अशा व्यवस्थेलाच सामाजिक नियंत्रण म्हणून ओळखले जाते. शिक्षण, कायदा, सूचना, कुटुंब, धर्म, परंपरा, श्रद्धा अशा साधनांच्या साहाय्याने सामाजिक नियंत्रण निर्माण केले जाते. ज्या साधनांच्या साहाय्याने समाजातील व्यवस्था टिकवून ठेवली जाते. त्याला सामाजिक नियंत्रण असे म्हटले जाते. या संकल्पनेचा अर्थ पुढील व्याख्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

### व्याख्या - Definitions

1) लँडिस पी. एच. :-

"ज्या प्रक्रियेद्वारा समाजात व्यवस्था प्रस्थापित केली जाते आणि ती टिकवून ठेवली जाते. त्या प्रक्रियेला सामाजिक नियंत्रण असे म्हटले जाते."

Scanned with CamScanner

२) एडवर्ड रॉस :-
"समाजाने स्विकृत केलेल्या वर्तन प्रतिमानानुसार सदस्यांनी वर्तन करावे, म्हणून वापरल्या जाणाऱ्या साधनांची व्यवस्था म्हणजे सामाजिक नियंत्रण होय."

३) मॅकायव्हर व पेज :-
"सामाजिक नियंत्रण म्हणजे समाजव्यवस्थेत ऐक्य निर्माण करणारी ~~व्यवस्~~ आणि व्यवस्था टिकवून ठेवणारी पद्धत होय."

४) शेफर्ड :-
"व्यक्तींना नियमानुसार वागण्यास भाग पाडणारी प्रक्रिया म्हणजे सामाजिक नियंत्रण होय."

सामाजिक नियंत्रणामध्ये समाजाने व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणे अभिप्रेत आहे. समाजात व्यवस्था निर्माण करून ती टिकवून ठेवणारी प्रक्रिया म्हणून सामाजिक नियंत्रणाच्या प्रक्रियेला ओळखले / ओळखतात. या प्रक्रियेचा अर्थ पुढीलप्रमाणे :-

① सामाजिक नियंत्रण ही एक सामाजिक सार्वत्रिक स्वरूपाची प्रक्रिया असून व्यक्ती आणि समाजावर नियंत्रण ठेवत असते.
② व्यक्ती आणि समाजावर प्रथा, परंपरा, लोकनीती, कायदा, धर्म या साधनांद्वारे नियंत्रण ठेवले जाते.
③ समाजातील लोकांनी सामाजिक नियमानुसार वागले पाहिजे हा नियंत्रणामागे उद्देश असतो.
④ सामाजिक नियंत्रणात नियंत्रक आणि नियंत्रित असे दोन पक्ष असतात.
⑤ सामाजिक नियंत्रण हे नियोजित आणि अनियोजित स्वरूपाचे असते.
⑥ सामाजिक नियंत्रण हे समाजानुसार बदलत असल्याने ते समाजसापेक्ष स्वरूपाचे ठरते.
⑦ अनुपालनात्मक वर्तन घडवणारी यंत्रणा म्हणून सामाजिक नियंत्रणास ओळखले जाते.

Scanned with CamScanner

⑧ सामाजिक नियंत्रणाच्या प्रक्रियेमध्ये काहीवेळा शारिरीक व दबावतंत्राचा वापर केला जातो.

⑨ सामाजिक नियंत्रणामधून अनुरूपता, ऐक्य आणि सातत्य अपेक्षित असते.

वरीलप्रमाणे सामाजिक जीवनामध्ये व्यक्तींना समाजमान्य वर्तन घडवून आणण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडणारी सामाजिक नियंत्रण ही संकल्पना स्पष्ट केली आहे.

Scanned with CamScanner

## (ब) सामाजिक नियंत्रणाची कार्ये अथवा उद्दिष्टे

**(Functions or Aims of Social Control)**

समाजात सुसंघटितपणा, व्यवस्थितपणा यावा, समाजाचे समतोलत्व टिकावे, समाजात शांतता-सुव्यवस्था टिकावी, समाजातील विविधतेवर मर्यादा असाव्यात, एकात्मता नांदावी, अराजकता-बेबंदशाही माजू नये यासाठी सामाजिक नियंत्रणाची आवश्यकता असते. याच संदर्भात सामाजिक नियंत्रणाचे हेतू स्पष्ट होतात, तसेच

Scanned with CamScanner

सामाजिक नियंत्रणाच्या कार्याची दिशा निश्चित होते. या कार्याचे स्वरूप कसे असते, कार्ये कोणत्या प्रकारची असतात याविषयी पुढीलप्रमाणे माहिती घेता येते.

**१. समाजाचे अस्तित्व टिकविणे :** मानवी समाज हा त्यातील व्यक्तींच्या परस्पर - संबंधांवर आधारित असतो. या संबंधाचे दृढ स्वरूप आणि स्थिरता यावर समाजाचेही स्थैर्य व दृढता, अस्तित्व अवलंबून असते. त्यासाठी व्यक्तिवर्तनाचे नियंत्रण करणे आवश्यक असते. हे कार्य अर्थातच सामाजिक नियंत्रण करीत असते. समाजातील वर्तनविषयक नियमांना अनुसरूनच व्यक्ती आपल्या गरजा पूर्ण करीत असतात, आपली कार्ये पार पाडीत असतात. त्यांच्यातील परस्परसंबंधच समाजाच्या अस्तित्वाला पोषक ठरत असतात. समाजात संघर्ष न होता समाजाचे अस्तित्व अबाधित ठेवण्याचे कार्य सामाजिक नियंत्रण करीत असते.

**२. समाजात अनुरूपता निर्माण करणे :** समाजात व्यक्ती तितक्या प्रकृती असतात. व्यक्ती-व्यक्तींमध्ये फार मोठ्या प्रमाणात फरक असतात. त्यांचे उद्देश, हेतू, दृष्टिकोण, आवडीनिवडी, आशा-आकांक्षा, अभिरुची, मूल्य, श्रद्धा, रूढी, आचारविचार अशा अनेक बाबतीत भेद असतात. अर्थात, असे भेद असणे हे समाजाचे वैशिष्ट्यच असते. पण अशा भेदांतूनही व्यक्ती-व्यक्तींमध्ये अनुरूपता घडावी, एकमेकांशी समायोजन करावे यासाठी सामाजिक नियंत्रण विविध साधनांद्वारे प्रयत्नशील असते. विविधतेत एकता निर्माण करण्याचे प्रयत्न केले जातात. अशी अनुरूपतेतून एकता निर्माण करणे हे सामाजिक नियंत्रणाचे ध्येय असते. अनुरूपतेतून सामाजिक जाणीव निर्माण होते व समाजाचे अस्तित्व टिकते.

**३. सामाजिक एकता निर्माण करणे :** समाजाला स्वतंत्रपणे काम करता येण्यासाठी समाजात ऐक्य असणे आवश्यक असते. समाजातील वेगवेगळ्या घटकांत सामंजस्य गरजेचे असते. समाजात विघटन होणार नाही याची दक्षता घेणे तसेच समाजात समतोलपणा राखण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असते. सामाजिक परस्परसंबंधात, सामाजिक वर्तनात समन्वय घडवून आणण्याचे, सहकार्य निर्माण करण्याचे व त्याद्वारे सामाजिक एकता निर्माण करण्याचे व ती टिकविण्याचे कार्य सामाजिक नियंत्रण करीत असते. तसेच एकात्मतेविषयी सामाजिक जाणीव निर्माण केली जाते. समाजात सुसंवाद निर्माण केला जातो व सामाजिक समतोल निर्माण करून एकता प्रस्थापित केली जाते.

**४. सामाजिक सातत्य व स्थैर्य निर्माण करणे :** समाजाच्या सातत्यावर व स्थिरतेवरच व्यक्तींची उन्नती, प्रगती अवलंबून असते. तसेच समाजाच्या विविध प्रकारच्या गरजा समाज सातत्य व स्थिरतेवरच अवलंबून असतात. यासाठी व्यक्तिवर्तनाचे नियंत्रण करावे लागते व हे कार्य सामाजिक नियंत्रण करीत असते. सामाजिक नियंत्रणाची साधने हा

Scanned with CamScanner

संस्कृतीचाच एक भाग असतो आणि संस्कृतीचे संक्रमण योग्य पद्धतीने झाले तरच समाजाचे सातत्यही टिकू शकते. सांस्कृतिक उन्नती, परिपक्वता सामाजिक स्थैर्य निर्माण करण्यास पोषक ठरत असते. अशा स्थैर्यावरच मानवसमाजाची प्रगतीच्या दिशेने घोडदौड चालू असते.

**५. सामाजिक कर्तव्यांची पूर्तता करणे :** समाजातील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक दर्जा असतो व दर्जानुसार प्रत्येकाला आपापली भूमिका पार पाडावी लागते. ती भूमिका म्हणजेच व्यक्तीचे समाजातील कर्तव्य असते. ही कर्तव्ये योग्य रीतीने पार पाडण्यास व कर्तव्यपूर्तीसाठी प्रोत्साहन देण्यास सामाजिक नियंत्रणालाच कार्य करावे लागते. त्यासाठी समाजात रूढी, परंपरा, मूल्ये प्रस्थापित झालेली असतात. अशा कर्तव्यपूर्तीतूनच समाजात नियमितपणा, सुव्यवस्था निर्माण होत असते व समाजाची स्थिरता व अस्तित्व अबाधित राहते.

किंबॉल यंग यांनी या संदर्भात असे म्हटले आहे की, ‘‘प्रत्येक समूहात अगर समाजात अनुरूपता, ऐक्य व सातत्य प्रस्थापित करणे ही सामाजिक नियंत्रणाची उद्दिष्टे आहेत.’’ ("The aim of social control is to bring about conformity, solidarity and continuity of a particular group or society.")

मानवी शरीरात ज्याप्रमाणे पांढऱ्या पेशींचे कार्य बाहेरील जंतूंपासून शरीराचे रक्षण करणे हे असते व तांबड्या पेशी ज्याप्रमाणे शरीराला रक्तपुरवठा करीत असतात त्याचप्रमाणे सामाजिक नियंत्रणाची विविध साधने समाजात समाजरक्षणाचे, स्थैर्याचे, एकात्मतेचे, सातत्याचे, व्यक्तिवर्तनाच्या नियंत्रणाचे कार्य करीत असतात. तसेच समाजात प्रत्येक गोष्टीला एक विशिष्ट स्वरूपाचे कार्य असते व अशा कार्यातून सामाजिक गरजपूर्ती होत असते. उदा. संस्थात्मक कार्ये. याच स्वरूपाची विविध प्रकारची कार्ये सामाजिक नियंत्रणाला पार पाडावी लागतात. आपले उद्देश पूर्ण करावे लागतात.

Scanned with CamScanner

c) सामाजिक नियंत्रणाचे प्रकार :-

Forms of social Control.

प्रस्तावना :-

समाजात प्रत्यक्ष सामाजिक नियंत्रण प्रभावी होण्यासाठी ते कोणत्या पद्धतीने निर्माण झालेले आहे. याचा अभ्यास देखील महत्त्वाचा ठरतो. प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक वर्तनाचे स्वरूप आणि समाजाचे स्वरूप याचा विचार करून सामाजिक नियंत्रण लागू केले जाते. समाजातील हितसंबंध, भावना, विचार यामुळे देखील समाजात विविधता आढळते. त्यामुळेच समाजात सामाजिक नियंत्रणाचे अनेक प्रकार दिसून येतात. ते पुढील प्रमाणे :-

1) औपचारिक नियंत्रण आणि अनौपचारिक नियंत्रण :-

Formal And Informal Control

प्रत्येक समाजात सामाजिक नियंत्रणाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी वापरली जाणारी साधने जाणीव पूर्वक निर्माण केलेली आहेत किंवा परिस्थितीनुसार, गरजेनुसार निर्माण झालेली आहेत याच्या आधारे औपचारिक व अनौपचारिक नियंत्रण हे प्रकार ही पाडले जातात. ते पुढील प्रमाणे :-

A) औपचारिक नियंत्रण :- Formal Control

औपचारिक सामाजिक नियंत्रण हे जाणीवपूर्वक निर्माण केलेले असून ते विविध नियमांच्या आधारे स्पष्ट केलेले असते. अशा नियमांचे पालन योग्य प्रकारे होण्यासाठी विशेष दक्षता घेतली जाते. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या

व्यक्तीस शिक्षा केली जाते. राज्यसंस्थेने कायदे आणि प्रशासकीय नियमांच्या सहाय्याने तसेच काही संघटनांनी परस्पर संबंधाचे नियमन करण्यासाठी केलेले नियंत्रण म्हणजे औपचारिक नियंत्रण होय. कायदा, शिक्षा ही औपचारिक नियंत्रणाची साधने आहेत.

B] अनौपचारिक नियंत्रण :- Informal control

सामाजिक नियंत्रणाची उद्दिष्ट्ये पूर्ण होण्यासाठी परिस्थितीनुसार जी साधने पूर्व नियोजनाशिवाय निर्माण होतात. त्याला अनौपचारिक नियंत्रण म्हणून ओळखले जाते. अनौपचारिक नियंत्रणाच्या साधनांचे आणि अंमलबजावणीचे स्वरूप औपचारिक नियंत्रणाहून भिन्न असते. प्रथा, परंपरा, लोकरूढी, रीतीरिवाज या माध्यमातून स्वाभाविकपणे होणारे नियंत्रण अनौपचारिक नियंत्रण म्हणून ओळखले जाते.

हे नियंत्रण जाणीवपूर्वक निर्माण केले जात नाही. ते स्वाभाविकपणे उद्‌भवतात. या नियंत्रणाच्या विरोधी वर्तन करणाऱ्यास दंड किंवा शिक्षा केली जात नाही. बहिष्कार टिका करून वेगवेगळ्या प्रकारची शिक्षा केली जाते. गुंतागुंतीच्या समाजापेक्षा साध्या समाजात अनौपचारिक नियंत्रण प्रभावी असते. लोकरूढी, प्रथा, धर्म, लोकमत ही या नियंत्रणाची साधने आहेत. अनौपचारिक नियंत्रणासाठी अंमलबजावणी साठी स्वतंत्र यंत्रणाची गरज भासत नाही. या नियंत्रणाचे वेगळे अस्तित्व देखील दिसून येत नाही.

## 2] प्रत्यक्ष नियंत्रण आणि अप्रत्यक्ष नियंत्रण :-

व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण करणाऱ्या व्यक्ती प्रत्यक्ष संपर्कात येतात. किंवा प्रत्यक्ष संपर्कात न येता इतर मार्गांनी संपर्क साधतात सामाजिक नियंत्रण निर्माण करतात. या आधारे कार्ल मॅनहेम यांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सामाजिक नियंत्रण हे दोन प्रकार विषद केले आहेत. ते पुढील प्रमाणे :-

IMP

A] प्रत्यक्ष नियंत्रण :-

व्यक्तीच्या प्रत्यक्ष संपर्कात येणाऱ्या व्यक्ती अत्यंत जवळच्या, कुटुंब, शेजारी, मित्र यांच्या माध्यमातून परस्परांच्या वर्तनावर जे नियंत्रण ठेवले जाते. त्यास प्रत्यक्ष नियंत्रण

असे म्हटले जाते. प्रत्यक्ष नियंत्रणासाठी समूहाचा लहान आकार आणि संबंध असणे आवश्यक आहे. प्राथमिक समूहात प्रत्यक्ष नियंत्रण ठेवले जाते.

B] अप्रत्यक्ष नियंत्रण :-

अप्रत्यक्ष नियंत्रणामध्ये व्यक्ती-व्यक्तीमधील व्यवहार नियंत्रित करण्यासाठी कायदे, संस्था, संघटना यांचा उपयोग केला जातो. त्यास अप्रत्यक्ष नियंत्रण असे म्हणतात. हे नियंत्रण दुय्यम अशा विशाल समूहामध्ये व औपचारिक संघटनांमध्ये दिसून येते. औपचारिक संबंधांमुळे प्रत्यक्ष संबंध ठेवता येत नाहीत. प्रत्यक्ष नियंत्रणाच्या तुलनेत अप्रत्यक्ष नियंत्रण व्यक्तीला फारसे प्रभावी वाटत नाही.

3] सकारात्मक नियंत्रण आणि नकारात्मक नियंत्रण :-

किंबॉल यंग यांनी बक्षिस आणि शिक्षा यांच्या आधारे जे नियंत्रण निर्माण केले जाते, त्यांचे सकारात्मक आणि नकारात्मक नियंत्रण असे दोन प्रकार विषद केले आहेत ते पुढील प्रमाणे :-

A] सकारात्मक नियंत्रण :-

ज्या व्यक्तींकडून समाजमान्य वर्तन केले जाते. अशावेळी समाजमान्य वर्तनासाठी इतरांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सत्कार, बक्षिस, प्रशंसा इ. साधनांचा अवलंब केला जातो. यालाच सकारात्मक नियंत्रण म्हटले जाते. समाजमान्य वर्तनासाठी प्रोत्साहन देण्यासाठी अस्तित्वात असणारे नियंत्रण हे सकारात्मक नियंत्रण म्हणून ओळखले जाते.

उदा. महाविद्यालयातील प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थिनींचा सत्कार.

B] नकारात्मक नियंत्रण :-

ज्यावेळी एखादी व्यक्ती सामाजिक नियमनांचे उल्लंघन करते. अशा व्यक्तीस त्याच्या विचलित वर्तनाबद्दल, शिक्षा, कारावास, आर्थिक दंड केला जातो. व जे नियंत्रण निर्माण केले जाते. त्यास नकारात्मक वर्तन म्हणून ओळखले जाते.

भितीमुळे व्यक्ती विचलित वर्तन करणार नाही या हेतूने

नियंत्रण निर्माण केले जाते.

4] संघटित नियंत्रण आणि असंघटित नियंत्रण :-

प्रसिद्ध विचारवंत मूर यांनी सामाजिक नियंत्रणाच्या साधनांचे स्वरूप व मानसिक नियंत्रण निर्माण करण्यासाठी पुरस्कारादी यंत्रणा व असंघटित नियंत्रण हे दोन प्रकार स्पष्ट केले आहेत.

A] संघटित नियंत्रण :-

समाजामध्ये स्वतंत्र अशा यंत्रणे-मार्फत सामाजिक नियंत्रण निर्माण केले जाते. त्यास संघटित नियंत्रण म्हणून ओळखले जाते. पोलिस व न्याय व्यवस्था, नियम, कायदे यांचे पालन व्यक्ती करत आहेत की नाही हे पाहण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असते.

B] असंघटित नियंत्रण :-

समाजातील लोकनिती, परंपरा, प्रथा इ.चे पालन होते की नाही याचे निरीक्षण करण्यासाठी जी यंत्रणा हेतूपूर्वक निर्माण केली जात नाही. लोकरूढी, धर्म, प्रथा या अशा प्रकारच्या घटकांकडून व्यक्तीचे वर्तन नियंत्रित केले जाते. त्यास असंघटित नियंत्रण म्हणून ओळखले जाते. व्यक्तीच्या जीवनात असंघटित नियंत्रणाचा प्रभाव अधिक प्रमाणात दिसून येतो. समाज-मान्य वर्तन घडून येण्यासाठी, व्यक्तींच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी वरील प्रकारच्या सामाजिक नियंत्रणाच्या अवस्थेचा वापर केला जातो.

Scanned with CamScanner